मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | शनिवार, दि. 4 ऑक्टोबर 2025 | पान- 1

# पूरग्रस्त 50 गावांची दिवाळी गोड करण्याचा निर्धार!

## एक हात मदतीचा: भाजपा आमदार महेश लांडगे यांनी जपली मानवता

**पिंपरी | प्रतिनीधी**

मराठवाडा आणि अन्य जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकरी-कष्टकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अक्षरश: ओला दुष्काळ पडला आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना “एक हात मदतीचा” देण्यात येणार आहे. मराठवाड्यातील 50 पूरग्रस्त गावांतील नागरिकांची दिवाळी गोड करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

2019 मध्ये पश्चिम महाराष्ट्रात निर्माण झालेली पूरपरिस्थिती आणि कोकणातील चक्रीवादळ आपत्तीच्या काळात भाजपा आमदार महेश लांडगे यांनी “एक हात मदतीचा” मोहीम हाती घेतली होती. त्यावेळी मोठ्या प्रमाणात मदतकार्य करण्यात आले. त्याचे महाराष्ट्रभरात कौतूक झाले होते.

आता मराठवाडा आणि अन्य जिल्ह्यांमध्ये महापूर परिस्थिती आहे. पिंपरी-चिंचवडमधून पुन्हा एकदा मदतकार्य उभा करण्यासाठी नियोजन बैठक घेण्यात आली.




### हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचाही पुढाकार...

**‘एक हात मदतीचा’उपक्रमांतर्गत मराठवाड्यातील 50 गावांमध्ये मदत एकाच दिवशी रवाना करण्याचे नियोजन आहे. दि.3 ते 11 ऑक्टोबर 2025 मदत संकलन, पॅकिंग आणि वितरण व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच, गुरूवार दि. 9 ऑक्टोबर रोजी सर्व मदतीच्या गाड्या रवाना होतील. दि. 10 व 11 रोजी पुरग्रस्त भागात मदत वितरण होईल. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक “स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ च्या आवारात मदत घेवून जाणाऱ्या गाड्यांचे पूजन होईल आणि मदत मराठवाड्याकडे पाठवण्यात येईल. याकामी हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट नियोजन कार्यात पुढाकार घेत आहे.**

> “मराठवाडा आणि अन्य जिल्ह्यात महापुरामुळे शेतकरी-कष्टकरी यांचे अपार नुकसान झाले. शेवटच्या घटकापर्यंत मदतकार्य पोहोचवता यावे. याकरिता आम्ही पिंपरी-चिंचवडकरांच्या लोकसहभागातून ‘एक हात मदतीचा’ उपक्रम हाती घेतला आहे. जीवनाश्यक वस्तुंचे वितरण, गोधन दान आणि त्यानंतर गरजुंना शैक्षणिक मदत अशी तीन टप्प्यांमध्ये मदतकार्य उभा करण्याचा संकल्प आहे. आपल्या योगदानामुळे किमान एका पूरग्रस्त कुटुंबाची दिवाळी गोड व्हावी, अशा भावनेतून पिंपरी-चिंचवडकरांनी मदतकार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करतो.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

---

# चोविसावाडीत लिफ्टमध्ये अडकून 11 वर्षीय मुलाचा मृत्यू

## लिफ्टच्या दरवाजाच्या मधल्या जागेत अडकून अमेय फडतरे गंभीर जखमी

**पिंपरी | प्रतिनीधी**

चोविसावाडी येथील ११ वर्षीय मुलाचा लिफ्टमध्ये अडकून मृत्यू झाला आहे. ही घटना ऐन दसरा, विजयादशमीच्या दिवशी घडली आहे. अमेय फडतरे असं मृत्यू झालेल्या मुलाचं नाव आहे. या दुर्दैवी घटनेमुळे फडतरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमेय फडतरे हा अकरा वर्षीय मुलगा लिफ्ट सोबत खेळत होता. जिन्याने वर जाऊन



> “पालकांनी मुलांवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. आपला मुलगा कुठं आहे? कसा खेळत आहे, हे पाहायला हवे. लहान मुलांनी मोठी माणसे असल्याशिवाय लिफ्टमध्ये जाऊ नये.
>
> **– बापू बांगर, पोलीस उपायुक्त**

लिफ्टने खाली यायचा. हे असंच काही मिनिट सुरू होत. याचा शेवट असा होईल असं कुणालाही वाटलं नाही. लिफ्टच्या दरवाजाच्या मधल्या जागेत अडकून अमेय गंभीर जखमी झाला. रक्ताच्या थारोळ्यात अडकलेल्या अमेयला अग्निशमनच्या जवानांनी तात्काळ येऊन काढलं. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. परंतु, अमेयचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. घटनेमुळे फडतरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ही घटना गुरुवारी दुपारी साडेपाचच्या सुमारास घडली आहे. दिघी पोलीस याबाबत तपास करत आहेत.

# नागरिकांकडून भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांना अनोखे 'गिफ्ट'

## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मित्रपरिवारासह प्रभागातील नागरिकांचा पुढाकार

**पिंपरी | प्रतिनिधी**

मराठवाडा, अहिल्यानगर व सोलापूर जिल्ह्यातील भीषण पूर परिस्थितीमुळे जनजीवन कोलमडले आहे. या बांधवांना मानवतेच्या दृष्टीकोनातून मदत करण्यासाठी भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांचा अभिष्टचिंतन सोहळा प्राधिकरण येथील जनसंपर्क कार्यालयात साधेपणाने व समाजभिमुख उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी परिसरातील नागरिकांनी व मित्र परिवारांकडून पूरग्रस्तांसाठी व अनुप मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त भरभरून मदत करण्यात आली. दोन ट्रक अत्यावश्यक साहित्य वाढदिनी मराठवाड्यातील बीड जिल्ह्याकडे रवाना करण्यात आले.




सध्या मराठवाडा आणि सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त भागात हजारो कुटुंबांचे हाल होत आहेत. अन्नधान्य, वस्त्र, निवारा, औषधे यांची तीव्र टंचाई भासत आहे. या परिस्थितीत वाढदिवस साजरा करण्याऐवजी अनुप मोरे यांनी समाजहिताचा मार्ग स्वीकारला. अनुप मोरे सोशल अँड स्पोर्ट्स फाऊंडेशनच्या वतीने "एक हात मदतीचा" या उपक्रमातून पूरग्रस्तांसाठी जीवनावश्यक वस्तू, अन्नधान्य, औषधे, शालेय साहित्य अशा मदतसामग्रीचा मोठा साठा तयार करून ती सामग्री पुरबाधित भागात रवाना करण्यात आली.

सोहळ्याची सुरुवात आकुर्डीतील तुळजाभवानी मातेच्या दर्शनाने करण्यात आली. त्यानंतर मातृसेवा सेवाभावी संघातील निराधार ज्येष्ठ नागरिकांची भेट घेऊन त्यांना आर्थिक मदत देण्यात आली. त्यांच्या आरोग्याची विचारपूस करत आशीर्वाद घेण्याचा भावनिक क्षणही अनुभवास आला.

समाजहिताच्या दृष्टीने रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने आकुर्डी येथील कुटे हॉस्पिटलमध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. स्थानिक नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे एकूण ७६ रक्तदात्यांनी रक्तदान करून जीव वाचविण्याच्या कार्यात योगदान दिले. याशिवाय गोमातेचे पूजन व गाईंसाठी चारा वाटप करून पर्यावरण आणि पशुप्रेमाचा संदेशही देण्यात आला.

या विधायक उपक्रमांदरम्यान भाजपसह सर्वपक्षीय नेत्यांनी अनुप मोरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. उपस्थितांमध्ये भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, मावळचे खासदार श्रीरंग बारणे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल, माजी नगरसेवक उल्हास शेट्टी, शिवसेना उपनेत्या सुलभा उबाळे, माजी नगरसेवक राहुल कलाटे, राम वाकडकर, प्रसाद शेट्टी, केशव घोळवे, विनायक गायकवाड, राजू मिसाळ, प्रमोद कुटे, आर एस कुमार, सलीम शिकलगार, राजेंद्र बाबर, विजय शिनकर, अरुण थोरात, अतुल इनामदार, समीर जावळकर, मनोज देशमुख, सचिन कुलकर्णी यांच्यासह भाजप युवा मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, मिस अर्थ इंडिया २०२५ स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करून उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कोमल चौधरी आणि महाराष्ट्र टेबल टेनिस स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या सानवी मोरे यांचा अनुप मोरे सोशल अँड स्पोर्ट्स फाऊंडेशनच्या वतीने सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्यामुळे कार्यक्रमाला वेगळेच वैशिष्ट्य प्राप्त झाले. समाजहित, सेवाभाव, पर्यावरणप्रेम आणि क्रीडाप्रेम अशा विविध अंगांनी सजलेल्या या आगळावेगळ्या सोहळ्यामुळे अनुप मोरे यांचा वाढदिवस केवळ एक औपचारिक अभिष्टचिंतन न राहता समाजासाठी प्रेरणादायी संदेश देणारा दिवस ठरला.

> मानवता हाच खरा धर्म आहे, हाच धर्म जपण्याचा प्रयत्न आपण करत असतो. पूरपरिस्थितीमुळे मराठवाडा, सोलापूरसह अहिल्यानगर परिसरातील नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. त्यामध्ये वाढदिवस धूमधडाक्यात साजरा करणे आपल्याला न पटणारे होते. वाढदिवसानिमित्त या पूरग्रस्तांसाठी आपण कशापध्दतीने मदत करू शकतो हा विचार सुरु होता, ऐवढ्यात मित्रपरिवार प्रभागातील नागरिकांनी भरभरून मदतीचा ओघ सुरु केला. वैयक्तिक अन् नागरिकांच्या सहकार्याने दोन ट्रक अत्यावश्यक असणारे साहित्य पूरग्रस्तांसाठी रवाना केले.
>
> **- अनुप मोरे, भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष.**

# आकुर्डीत 35 फुटी रावणाचे दहन

**पिंपरी | प्रतिनीधी**

शिवसेना नगरसेवक प्रमोद कुटे यांच्या वतीने विजयादशमी निमित्त ३५ फुटी रावणाचे दहन करण्यात आले. तसेच प्रभु श्रीराम, लक्ष्मण, सीता व हनुमान यांची अश्वरथ व ढोल ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघटक मिलिंद देशपांडे, युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजित बारणे, हिंजवडीचे माजी सरपंच विक्रम साखरे, उद्योजक रवींद्र नामदे, विठ्ठल साखरे, सामाजिक कार्यकर्ते विशाल काळभोर, सागर धुमाळ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रमोद कुटे यांच्या वतीने दवर्षी नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. विजयादशमी निमित्त प्रभु श्रीराम, लक्ष्मण, सीता व हनुमान यांची अश्वरथ व ढोल ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी सीता हरण, रावण वधाचा जिवंत देखावा सादर करण्यात आला. त्यानंतर ३५ फुटी रावणाचे दहन करण्यात आले. देखावा, मिरवणूक आणि रावण दहन पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

प्रमोद कुटे म्हणाले, आकुर्डीत मोठे, प्रशस्त रुग्णालय उभारले आहे. त्यामुळे नागरिकांना दर्जेदार उपचार मिळत आहेत. या भागात सिमेंट काँक्रीटचे अंतर्गत रस्ते केले. पाळखी तळ, कमान केली आहे. पोलिसांच्या मदतीने परिसरातील गुन्हेगारी कमी करण्यात यश आले आहे. या भागाचा आणखी विकास करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे यंदाचे शताब्दी वर्षे आहे. स्वयंसेवक पर्यावरण संरक्षण, कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, नागरी कर्तव्ये आणि 'स्व'बोध यासाठी कार्यरत आहेत. शताब्दी वर्षानिमित्याने संघातर्फे या पाच प्रमुख मुद्द्यांवर समाजजागृती करण्यात येत असल्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघटक मिलिंद देशपांडे यांनी सांगितले.

# दांडिया अन् गरबावर थिरकली तरुणाई

**पिंपरी | प्रतिनीधी**

परिसरातील तरूणाईसाठी भव्य गरबा अन् दांडिया चे नियोजन आवश्यक होते. हीच गरज ओळखून मा. नगरसेविका साधना मळेकर यांनी पिंगळे रोड येथे कबड्डी ग्राऊंड वर भव्य-दिव्य नवरात्रोत्सवानिमित्त गरबा अन् दांडियाचे नियोजन केले होते. या उत्सवाला परिसरातील तरूणाईसह अबालवृध्दांनी भरभरून प्रतिसाद दिला. नवरात्रोत्सवातील नऊ दिवस गरबा, दांडियाने परिसरात चैतन्य निर्माण झाले होते.



पिंगळे रोड राधा स्वामी सत्संग समोरील बाजूस कबड्डी मैदान येथे गरबा अन् दांडियाचे नियोजन करण्यात आले होते. नवरात्रोत्सव हा स्त्री शक्तीचा असल्याने विविध क्षेत्रातील महिलांचा साडीचोळी देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी चिखली परिसरातील जेष्ठ नेते, उद्योजक, भाजप सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी म्हणजेच नवव्या माळेला सिनेअभिनेत्री प्राजक्ता गायकवाड यांनी गरबा-दांडिया खेळणाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हजेरी लावली होती. या उत्सवामध्ये बक्षीसांची लयलूट करण्यात आली.

आमदार महेश दादा लांडगे यांनी कार्यक्रमाला उपस्थिती दाखवून नगरसेविका साधना मळेकर यांच्या कामाचे कौतुक केले. भविष्यातही असेच चांगले कार्य करत रहा अशा शुभेच्छा दिल्या.

> गरबा आणि दांडिया या पारंपरिक नृत्यांसाठी तरुणाईकडून प्रचंड आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो, कारण या सणांमध्ये तरुणाईला पारंपरिक वेशभूषेत आधुनिक गीतांवर नाचण्याची, पारंपरिक वेशभूषेत नाचण्याची, आणि स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळते. नवरात्रीदरम्यान आयोजित होणाऱ्या गरबा आणि दांडियाच्या कार्यक्रमात तरुणाई मोठ्या संख्येने सहभागी होते, आणि या कार्यक्रमांना मिळणाऱ्या उत्साही प्रतिसादांमुळे ते शहरातील एक महत्त्वाचे आकर्षण ठरले.
>
> **- साधना मळेकर, मा. नगरसेविका.**

# रावण दहणाने वाईटांवर चांगल्याचा विजयोत्सव

## चिखलीतील साने चौक येथे विजयादशमीनिमित्त 45 फुटी रावण दहण



**पिंपरी | प्रतिनिधी**

वाईटावर चांगल्या प्रवृत्तीचा विजयाचे प्रतीक असलेल्या विजयादशमीचा सण रावण दहनाने उत्साहात साजरा झाला. चिखलीतील वीर अभिमन्यू फ्रेंड सर्कल, दत्ता काका साने प्रतिष्ठाणतर्फे साने चौक चिखली येथे उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रावणदहण पाहण्यासाठी तसेच गरबा दांडिया खेळण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. तरूणाईचा उत्साह वाखाण्याजोगा होता.

चिखलीतील साने चौक येथे विजयादशमीच्या निमित्ताने रावणदहण करण्यात आले. या उपक्रमास महाराष्ट्राचे युवानेते पार्थ पवार, शहराध्यक्ष योगेश बहल, शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट, माजी शहराध्यक्ष अजित गव्हाणे,माजी सत्तारूढ पक्षनेत्या मंगला कदम, माजी नगररसेविका संगीता ताम्हाणे यांच्यासह राष्ट्रवादीचे इतर नेते, परिसरातील जेष्ठ आणि मित्रपरिवार उपस्थित होते.

दरवर्षी साने चौक परिसरात नवरात्रोत्सवानिमित्त गरबा अन् दांडियाचे भव्य-दिव्य नियोजन केले जाते. परिसरातील तरूणाईचा उदंड प्रतिसाद असतो. राज्याच्या कानाकोपऱ्यातील नागरिक या परिसरात स्थायिक आहेत. त्यांच्यासाठी दरवर्षी वीर अभिमन्यू फ्रेंड सर्कलचे अध्यक्ष यश साने यांच्या वतीने भव्य-दिव्य गरबा दांडियांचे नियोजन केले जाते. सिने अभिनेत्री यांची उपस्थिती तरूणाईला प्रोत्साहन देण्यासाठी असते.

ढोलीडा, गरबे की रात, उडी उडी जाये, चो गाडा तारा, पेथल पूरमा अशा हिंदी चित्रपटातील तर काही पारंपरिक गरबा आणि दांडियाच्या गाण्यांवर चिखलीत दांडिया खेळण्याचा उत्साह दुणावला आहे. पारंपरिक गुजराती गीतांवर गरबाचे कार्यक्रम रंगत असून, त्यात नॉनस्टॉप बॉलिवूड गाण्यांचा तडका असे समीकरण पाहायला मिळत आहे.पारंपरिक वेशभूषेत दांडिया गीतांवर थिरकरणारे तरुण-तरुणी, गरबा करणारे पुरुष अन् वैविध्यपूर्ण वेशभूषेत मैत्रिणींबरोबर दांडियात सहभागी झालेल्या महिला अशा आनंदी वातावरण पहायला मिळाले.

# जाधववाडीत विजयादशमीनिमित्त रावणदहण




**पिंपरी | प्रतिनिधी**

विजयादशमी निमित्त प्रभू रामचंद्राचा जयघोष करीत जाधववाडी भागात रावणाच्या पुतळ्यांचे प्रतीकात्मक दहन करण्यात आले. फटाक्यांची आतषबाजी, नयनरम्य लेझर शो अशा थाटात हा उत्सव साजरा केला. विशालभाऊ आहेर युवा मंचच्या वतीने या उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

श्री.छत्रपती शिवाजी महाराज क्रिडांगण जाधववाडी येथे भव्य रासदांडिया अन् गरबा तसेच रावणदहण उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच दसरामेळावा, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित गरबा-दांडियानिमित्त दुचाकी, वॉशिंग मशीन, टीव्ही, गिझर, होम थिएटर, मिक्सर अशा बक्षीसांची लयलूट करण्यात आली.

तरूणाईच्या गरबा-दांडियाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रसिध्द नृत्यांगना ऐश्वर्या जाधव आणि त्यांचा डान्स ग्रुप यांनी हजेरी लावली होती. युवानेते विशाल आहेर यांच्यातर्फे आयोजित कार्यक्रमाला माजी शहराध्यक्षा अजित गव्हाणे, भोसरी मतदार संघाचे प्रथम आमदार विलास लांडे, शिवसेनेच्या रूपाली आल्हाट यांच्यासह मित्र परिवार यावेळी उपस्थित होते.

ढोलीडा, गरबे की रात, उडी उडी जाये, चो गाडा तारा, पेथल पूरमा अशा हिंदी चित्रपटातील गाण्यांसह यंदा गरबा रास दांडियात मराठी गाण्यांचा रिमिक्स गाण्यांची धूम दिसून आली. दांडिया, गरबामध्ये हिंदी, राजस्थानी व गुजराथी भाषेतील गाण्यांसह मराठी गाण्यांनाही तरुणाईने पसंती दिल्याचे दिसून आले. त्यामध्ये धर्मवीर चित्रपटातील 'अष्टमी', तमाशा लाईव्ह मधील 'रंग लागला', तू ही रे मधील 'गुलाबाची कळी', वंशवेलमधील 'अंबे कृपा करी', चंद्रमुखीमधील टायटल साँग, सख्या सजना ही नवी गाणी तसेच मी हाय कोळी, ठाकर वाडी, राधिका रे, चल गं पारू या पारंपरिक गाण्यांवर तरुणाई बेधुंद होऊन थिरकताना दिसून आली.

# मराठवाडा जनविकास संघाकडून 1000 हून अधिक पूरग्रस्त कुटुंबांना मदत



**पिंपरी | प्रतिनिधी**

मराठवाडा जनविकास संघ (महाराष्ट्र राज्य) आणि मराठवाडा मुक्तिसंग्राम समन्वय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाड्यातील पूरग्रस्त भागांमध्ये 'सेवा हीच ईश्वर पूजा' या भावनेतून अत्यावश्यक मदतीचे मोठे कार्य हाती घेण्यात आले असून, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अरुण पवार यांच्या नेतृत्वाखाली एक हजार पुरग्रस्त कुटुंबांना धान्य किट आणि अत्यावश्यक साहित्याचे थेट गावा-गावांत जाऊन वाटप करण्यात आले. यामध्ये तांदूळ, डाळी, बेसन, तेल, साखर, मीठ, मिरची पावडर यांसारख्या धान्यासोबतच ब्लँकेट, चटई, साडी, टॉवेल आणि प्रातिनिधिक स्वरूपात शालेय साहित्याचा समावेश आहे.

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील कोळवाडी, ब्रम्हनाथ बोरगाव, गात शिरापूर तसेच धाराशिव जिल्ह्यातील भूम व परंडा तालुक्यात देवगाव ( खुर्द) व वाघेगव्हाण या गावांमध्ये तहसीलदार निलेश काकडे, नायब तहसीलदार पांडुरंग मांडेकर, प्रकाश इंगोले, शाहुराज कदेरे, युवराज माने, बाळासाहेब काकडे, संजय माने, गोकुळ शितोळे, संतोष भोरे, गणेश गंगा विठ्ठल, विवेक पाटील, सुशांत क्षीरसागर, अशोक भोरे, शंकर तांबे, संतोष तांबे, मनोज मोरे, चंद्रकांत मोरे, सतीश मुरकुटे, सूर्यकांत कुरूलकर, दत्तात्रय धोंडगे, वामन भरगंडे, सखाराम वालकोळी, सुग्रीव पाटील, बळिराम कातंगळे, अनिताताई पांचाळ, केशव बोधले, गोविंद तांबवडे, रंगनाथ आवारे, लक्ष्मण जाधव, जीवन बोराडे, कृष्णा जाधवर, सचिन स्वामी, तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत किट वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी 'शालेय साहित्य' मदतीची गरज :

पूरग्रस्त भागात अन्नधान्य व कपडे मिळाल्याने जगण्याचा आधार मिळाला असला, तरी परिस्थिती पाहता आता शालेय साहित्याची तीव्र गरज जाणवत आहे. पूर ओसरल्यावर विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबायला नको, या विचारातून मराठवाडा जनविकास संघाने आता 'मन आणि बुद्धी पोसली पाहिजे' या उद्देशाने शालेय साहित्य संकलनाचा नवा संकल्प केला आहे. अरुण पवार यांनी विविध देवस्थाने, प्रार्थनास्थळे आणि मंदिर ट्रस्टला या कार्यात सक्रिय होण्याची विनंती केली आहे. येत्या ८ ते १० ऑक्टोबर या कालावधीत शेतकऱ्यांसाठी धान्य, गरजू वस्तू आणि विद्यार्थ्यांसाठी वह्या, पुस्तके, दप्तर, स्टेशनरी यासारख्या साहित्याचा पूर्ण संच घेऊन मदत टेम्पो रवाना होणार आहे.

# Pune Metro: पहिल्यांदाच सर्वाधिक प्रवाशांचा टप्पा ओलांडला

## सप्टेंबर महिन्यात 75 लाख 92 हजारपेक्षा जास्त नागरिकांचा मेट्रोतून प्रवास

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरात दिवसेंदिवस वाहतूक कोंडीचा मनस्ताप नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे मागील चार महिन्यांपासून मेट्रोचेप्रवासी सातत्याने वाढत आहेत. जूनमध्ये ५२ लाख, जुलै महिन्यात ५९ लाख, ऑगस्टमध्ये ६९ लाख आणि सप्टेंबर महिन्यात ७५ लाख ९२ हजारपेक्षा जास्त नागरिकांनी मेट्रोतून प्रवास केला असून, मेट्रो सुरू झाल्यापासून पहिल्यांदाच सर्वाधिक ७५ लाख प्रवाशांचा टप्पा ओलांडला आहे.

महामेट्रोकडून वनाझ ते रामवाडी आणि पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट या दोन मार्गांवर सेवा सुरू आहे. एका दिवसाला साधारण २ लाख ५० हजार नागरिक मेट्रोतून प्रवास करत आहेत. शहरातील वाहतूक कोंडीचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. त्यामुळे बेस्ट सफर म्हणून प्रवाशांचा कल मेट्रोकडे दिसत आहे. जानेवारीपासून महामेट्रोमधून प्रवास करणाऱ्यांची संख्या टप्प्याटप्प्याने वाढताना दिसत आहे. प्रत्येक महिन्यात किंचित प्रवासी संख्या वाढत होती; पण जून महिन्यात पहिल्यांदाच थेट ४ लाख, तर जुलैमध्ये थेट ८ लाख, ऑगस्टमध्ये १० लाख आणि सप्टेंबर महिन्यात ७ लाख प्रवासी संख्या वाढली आहे. मेट्रोच्या दोन्ही मार्गांवर लांब पल्ल्याची प्रवासी सेवा सुरू झाल्याने नागरिकांना फायद्याचे ठरत आहे. शिवाय पीएमपीने तिकीट दर वाढविल्याचा फायदादेखील काही प्रमाणात मेट्रोला होत आहे.

**महिन्यानुसार मेट्रोची प्रवासी संख्या**

महिना - प्रवासी संख्या
मार्च - ४४ लाख ८१ हजार
एप्रिल - ४६ लाख ५९ हजार
मे - ४७ लाख ६२ हजार
जून - ५२ लाख ४१ हजार
जुलै - ५९ लाख ५८ हजार
ऑगस्ट - ६९ लाख ४८ हजार
सप्टेंबर - ७५ लाख ९२ हजार



### पहिल्यांदाच 75 लाखांवर

» सप्टेंबर महिन्यात गणेशोत्सव होता. या काळात रात्री उशिरापर्यंत मेट्रोसेवा सुरु होता. त्यामुळे प्रवासी संख्या वाढली आहे. शिवाय दररोजच्या वाहतूक कोंडीमुळेदेखील मेट्रोतून प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. तसेच स्वारगेट ते पीसीएमसीपर्यंत थेट प्रवासी सेवा असल्यामुळे लांबपर्यंत प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. परिणामी मेट्रोच्या प्रवासी संख्या वाढण्यास मदत होत आहे.

# बारामती विमानतळावर लवकरच 'नाईट लँडिंग'ची सुविधा

## आराखडा तयार करण्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती विमानतळ परिसराच्या विकासासाठी सर्वसमावेशक आराखडा तयार करून या विमानतळावर 'नाईट लँडिंग'ची सुविधा सुरू करण्यासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) तयार केलेला सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे देण्याचे आदेश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीत बारामती विमानतळावर 'नाईट लँडिंग' सुविधा सुरू करण्यासह या विमानतळाची धावपट्टी आणि परिसराच्या विकास; तसेच यवतमाळ, धाराशिव, लातूर आणि नांदेड विमानतळांवरही नाईट लँडिंग सुविधा सुरू करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

बारामती विमानतळावर 'नाईट लँडिंग'ची सुविधा सुरू करण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने कार्यवाही करावी. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) तयार केलेला 'नाईट लँडिंग'चा सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे हस्तांतरित करावा. उद्योग विभागाने याबाबत ते निर्णय घ्यावेत. बारामती विमानतळाच्या विकासासाठी सर्वसमावेशक आराखडा तयार करावा. त्यासाठी एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्या सहकार्याने सर्वेक्षण करून खर्चाचे अंदाजपत्रक बनवण्यात यावे, असे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीत दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, 'या निर्णयांमुळे बारामतीसह राज्यातील अन्य विमानतळांच्या विकासाला गती मिळेल. तसेच उद्योग आणि पर्यटन क्षेत्राला चालना मिळेल.' दरम्यान, बारामतीच्या विमानतळावर नाईट लँडिंगची सुविधा करण्याबाबत उपमुख्यमंत्री पवार हे पाठपुरावा करत आहेत. या सुविधेमुळे स्थानिक उद्योगधंद्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर बाजारपेठ उपलब्ध होऊ शकणार आहे. ग्रामीण भागातील शेती उत्पादनांच्या निर्यातीलाही चालना मिळेल, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.




> महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या समन्वयाने बारामती विमानतळाचा विकास करण्यासाठी आवश्यक ते सर्वेक्षण करावे. बारामती विमानतळाच्या विकासासाठी संभाव्य खर्चाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने तयार करावे.
>
> – अजित पवार, उपमुख्यमंत्री.